थोडक्यात...

'भूमिगत'चे उर्वरित काम मनपा करणार

औरंगाबाद,दि.७ (सांजवार्ता ब्युरो): भूमिगत गटार योजनेचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. ही योजना पूर्ण करण्याची कंत्राटदारांची अजिबात इच्छा नाही. वारंवार चर्चा केल्यानंतरही तो या कामासाठी तयार होत नाही. शहरात मनपाला ७६ कि.मी.ड्रेनेज लाईन टाकायची आहे. अद्याप जिथे जलवाहिन्यातच टाकण्यात आलेल्या नाहीत. अशा भागाची निवड करावी, अशी सूचना संबंधित विभागाला देण्यात आली आहे.भविष्यात हे काम मनपालाच करावे लागणार आहे. भूमिगत गटार योजनाची देखभाल दुरूस्ती खिल्लारी या कंपनीवर राहणार असल्याचे मनपा आयुक्त डॉ.निपुण विनायक यांनी सांगितले.

शुक्रवारी सगर महोत्सवाचे आयोजन

औरंगाबाद,दि.७ (सांजवार्ता ब्युरो):१०४ वर्षांची परंपरा असलेला सगर महोत्सव शुक्रवारी (९ नोव्हेंबर) रोजी साजरा करण्यात येणार आहे.वीरशैव लिंगायत गवळी समाज व जनसेवा क्रीडा मंडळाच्या वतीने हेल्यांचा सगर घेण्यात येत आहे. गवळी पुरा नवाबपुरा येथे सकाळी ११ वाजता सगरला सुरुवात होईल, शहराच्या व आसपासच्या विविध भागातून हेल्याची मिरवणूक येथे येणार आहे. त्यानंतर वाजतगाजत राजाबाजार, जाधवमंडी, गवळीपुरामार्गे, नवाबपुऱ्यात येवून मिरवणूकीचही सांगता होईल, या सगर महोत्सवाला उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

साहेबराव नवतुरे यांची निवड

औरंगाबाद,दि.७ (सांजवार्ता ब्युरो):पँथर्स रिपब्लिकन पार्टीच्या जिल्हा

शहर प्रभारीपदी तसेच ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी साहेबराव नवतुरे यांची निवड करण्यात आली. गंगाधर गाडे यांच्या आदेशानुसार त्यांची निवड करण्यात आली. मराठवाडा अध्यक्षपदी माणिक वाघमारे, मराठवाडा कार्याध्यक्ष संदीप खरात, संघटक सुभाष घाडगे, नानासाहेब म्हस्के, मनोज सरीन, पंकज बोर्डे, बाबा दांडगे, बाबूराव नरवडे, मॉन्टी सिंग, ज्ञानेश्वर खरात, नागपाल गंगावणे, राहुल जाधव, भूषण निकाळजे, सुनिल मगरे, राहुल मकासरे, राहुल जमधडे, अजय काकडे, दत्ता गाडेकर, रूंजाजी जाधव, नानासाहेब शिंदे, कईम शहा, अण्णा शिंदे, के.जी.मात्रे, राहुल नवतुरे, अनिल नवतुरे, अमोल नवतुरे आदींची निवड करण्यात आली.

भविष्य निर्वाह निधी देण्यासाठी मोहीम

औरंगाबाद,दि.७ (सांजवार्ता ब्युरो): कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम कर्मचाऱ्यास अथवा त्याच्या वारसास देण्यासाठी महावितरणच्या वतीने विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. सेवानिवृत्त अथवा कंपनी सोडलेल्या कर्मचाऱ्यांनी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये शिल्लक असलेली रक्कम काढून घ्यावी, असे आवाहन महावितरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित तथा पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातून सेवानिवृत्त झालेले तसेच मुदतपूर्व सेवा समाप्त झालेल्या काही कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये आजही रक्कम शिल्लक आहे. त्याची मागणी करण्यात आलेली नाही. भविष्य निधी कायद्याच्या तरतुदीनुसार कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात मागणी न केलेली रक्कम खात्यात ठेवता येत नाही.

ऐन दिवाळीत पथदिवे बंद

औरंगाबाद,दि.७ (सांजवार्ता ब्युरो): शहरातील दिवाळीपुर्वी सर्व पथदिवे दुरूस्त करण्याची जबाबदारी महापालिकेच्या विद्युत विभागाची होती. दि ५ पासून दिवाळीस सुरूवात झाली आहे. मात्र सोमवारी शहरातील पथदिवे बंद असल्याचे दिसून येत आहे.

शहरात ५५ हजारांहून अधिक पथदिवे आहेत.त्यातील १४ हजार पथदिव्यावर एलईडी दिवे बसविले आहेत.या पथदिव्याची देखभाल ,दुरूस्ती पुढील आठ वर्षे दिल्ली येथील कंपनीकडे सोपविली होती. उर्वरित ४१ हजार पथदिव्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी महापालिकेने तब्बल २२ कंत्राटदार एजन्सीची नेमणूक केली आहे.प्रत्येक एजन्सीला ठराविक वॉर्ड वाटून देण्यात आले आहेत.त्यांनी स्वतच्या खर्चाने संपूर्ण देखभाल दुरूस्ती करावी, या पध्दतीने काम देण्यात आले आहे. दर महिन्याला कोटयवधी रूपयांची बिले या खाजगी एजन्सीमार्फत दाखल करण्यात येतात. गणेशोत्सवात या कंत्राटदरांनी बिल थकल्याने कारण देवू काम बंद आंदोलन सुरू केले आहे. महापौर नंदकुमार घोडेले यांनी बिल अदा करण्याचे आश्वासन दिल्यावर काम सुरू केले होते.

पथदिवे दुरूस्तीकडे मनपाचे दुर्लक्ष

नंतर मनपा आयुक्तांच्या सुचनेनंतर सर्व कंत्राटदारांना कोटयवधींची बिले देण्यात आली. दिवाळीपुर्वी कंत्राटदराकडून सर्व बंद पथदिवे सुरू करून घेण्याची जबाबदारी प्रभारी उपअभियंता के. डी.देशमुख यांच्यावर आहे.त्यांनी कंत्राटदरांना दिवाळीपुर्वी पथदिवे सुरू करा अशी कोणतीच सुचना दिली नाही.त्यामुळे सोमवारी रात्री प्रमुख रस्त्यावर अंधाराचे साम्रज्य पसरले होते.

ऑनलाईन वादविवाद स्पर्धेचे आयोजन

औरंगाबाद,दि. ७ (सांजवार्ता ब्युरो): राहत हॉस्पिटल एप्यवेशन प्रोमोटर्स सोसायटी व नवजीवन दवाखाना, हर्सूल, औरंगाबाद यांच्या वतीने 'भारतात दारूबंदी व्हावी' या विषयावर अखिल भारतीय ऑनलाईन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा भारतात शिकणारे पदवीधारक व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी राहणार आहे. ही स्पर्धा उर्दू,मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेत होणार आहे. प्रत्येक भाषेत विषयाच्या समर्थनार्थ बोलणारे ६ व विरूध्द बोलणारे ६ असे १२ वक्ते निवडले जातील. प्रत्येक भाषेत विषयाच्या समर्थकापैकी सर्वप्रथम व विरोधकापैकी सर्वप्रथम निवडले जाणार असून, १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता या दोघात थेट वादविवाद होईल. प्रत्येक स्पर्धेकाने ८१७५७००७५०या मोबाईल क्रमांकावर नाव ,वय, कोर्स, महाविद्यालय,आयकार्ड कॉपी व विषयाच्या समर्थनात किंवा विरोधात आपल्या भाषणांची क्लिप पाठवावी.

याबाबत अधिक माहितीसाठी ८१७५७००७५० संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

जैन अलर्ट ग्रुपच्या वतीने गरजू कुटुंबांना फराळाचे वाटप

औरंगाबाद,दि.७(सांजवार्ता ब्युरो) : दिवाळी निमित्त जैन अलर्ट ग्रुपच्या सहकार्याने व विविध मंडळाच्या सदस्यांच्या वतीने औरंगाबाद शहरास जिल्हातील ग्रामीण भागात आदी ठिकाणी दिवाळी निमित्त फराळाचे वाटप करण्यात आले.

प्रत्येकाच्या घरी दिवाळीत आनंदमयी वातावरण असते. गरीब कुटुंबानी सुद्धा दिवाळी आनंदाने साजरी करावी. यासाठी जैन अलर्ट ग्रुपच्या वतीने समाजातील महिलांना रिकामे बॉक्स दिले व मंडळाने आपापल्या घरी बनविलेले गोड पदार्थ/नमकीन पदार्थ पॅकींग करुन ते जैन अलर्ट ग्रुपच्या सदस्यांकडे दिले व हे फराळ त्यांनी चार दिवसात पाच हजार गरजु कुटुंबांना या फराळाचे वाटप करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जैन अलर्ट ग्रुप, नम्रता ग्रुप, विमलनाथ जाप मंडळ, प्रभा किक्षरण महिला मंडळ, संस्कार महिला मंडळ, अहिंसानगर बहुमंडळ, जैन श्वेतांबर तेरापंथ महिला मंडळ, पार्श्वमहिला मंडळ, संगीनी महिला मंडळ, समता अॅक्टीव्ह ग्रुप, अहिंसानगर श्रावक संघ आदींनी परिश्रम घेतले.

जि.प. शाळेत विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप

सिल्लोड, दि.७ (प्रतिनिधी): वांगी बुद्रुक येथील जि. प .प्राथमीक शाळेत इयत्ता पहीली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त फराळाचे वाटप करण्यात आले. तसेच शिक्षकांनी दिपावलीच्या सुत्र्यानिमित्त चित्रकला, गणीत,सामान्यज्ञान या विषयावर आधारीत अभ्यासक्रमाची संचिका तयार करून विद्यार्थ्यांना देण्यात आली.सदरील दिलेला अभ्यास सर्व विद्यार्थ्यांनी पूर्ण करावा शाळेचे द्वितीय सत्र सुरू झाल्यानंतर दिलेला अभ्यासक्रम पुर्ण करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात येईल असे शाळेचे मुख्यध्यापक डि. एम .देशमुख यांनी सांगितले.यावेळी शिक्षक हेमंत बांगरे,कृष्णा सपकाळ, शेख आवेस, दाभाडे,दौड आदींची उपस्थिती होती.

जीपीएफची स्लीप आता गटशिक्षणाधिकाऱ्याकडून मिळणार

औरंगाबाद,दि.७ (सांजवार्ता ब्युरो): जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीच्या स्लिप्स दलालामार्फत होत असल्याने यात अनियमितता होत आहे. यासाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात यावे, यासाठी शिक्षण समितीचे शिष्टमंडळ लेखा व वित्त अधिकारी अप्पासाहेब चाटे यांना भेटले. त्यांनी ही मागणी मान्य केल्याने शिक्षकांनी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडेच संपर्क साधावा असे आवाहन विजय साळकर यांनी केले आहे.

विविध शिक्षक संघटनेचे पदाधिकारी स्वत:च इतराच्या सिल्पस घेवून शिक्षकांना देण्यात मोठेपण दाखवत आहेत. यातून स्लिपा गहाळ होणे, मोबदल्यात काही पैसे घेणे असे प्रकार घडत होते. ते होवू नये या स्लिपाचे वितरण गटशिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत प्रत्यक्ष शिक्षकांच्या हातात द्याव्यात अशी शिष्टमंडळाची मागणी होती. ती मान्य करण्यात आल्याने स्लिप वितरणात सुलभता आली आहे.

शिष्टमंडळात शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष विजय साळकर, शिक्षण परिषदेचे राज्यसरचिटणीस सुधाकर म्हस्के, जिल्हाध्यक्ष बाबुराव गाडेकर, श्रीराम बोचरे, दिलीप गोरे, वेनायक वाघ, जिजा उकिर्डे, खुलताबाद तालुकाध्यक्ष संयज बाहुले, दिनेश सपकाळे, अप्पाराव नलावडे यांचा समावेश होता.

जिल्हा सामान्य रुग्णालयात आयुर्वेदिक ओपीडीला सुरुवात

औरंगाबाद,दि.७ (सांजवार्ता ब्युरो) : चिकलठाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात सोमवारी पासून आयुर्वेदिक बाह्यरुग्ण विभागाची सुरुवात झाली. औपचारिक उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. एस. व्ही. कुलकर्णी, आयुर्वेद व्यासपीठ संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संतोष नेवपूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. लवकरच पंचकर्म केंद्र सुरू करण्यात येईल, अशी घोषणा प्रशासनाच्या वतीने करण्यात आली.

या वेळी सहसंचालक डॉ. व्ही. एस. भटकर, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अर्चना भोसले, डॉ. भारती नगरे, आयुष वैशाली खेडकर यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी वैद्य सोहन पाठक, आनंद कड्डी, अनघा नेवपूरकर, अश्विनी पाठक, संदीप औटे, निर्मला औटे, परेश देशमुख, भैरव कुलकर्णी-तावशीकर, देवयानी सादवते, मेघना चामरगोरे, शुभांगी सोनवतीकर, विनय सेवलीकर, अंबिका नरवडे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. रवींद्र बोर्डे यांनी केले. या बाह्यरुग्ण विभागात त्वचा विकार, मणक्याचे विकार, मधुमेह, पोटाचे, संधी विकार,पचनाच्या विकारांवर उपचार केले जातील. १० खाटांचा आंतररुग्ण विभागही या ठिकाणी कार्यान्वित होणार आहे. सामान्य आणि सौम्य आजारांवर उपचारांसाठी या बाह्यरुग्ण विभागाचा मोठा हातभार लागणार आहे.

जाहिरात छोटी करामत मोठी

वेड्या वाकड्या दातांसाठी
शासनमान्य, चॅरिटेबल श्री अनिलजी दत्तात्रय बडवे सेवाभावी संस्था संचलित
गणपती दंत रुग्णालय
* सर्व अद्ययावत सुविधा माफक दरात
* वेडेवाकडे दात सरळ करण्यासाठी
*फिक्स दात बसविण्यासाठी संस्थेच्या विविध योजना
अजंठा कॉम्प्लेक्स, कॅनॉट गार्डनसमोर, सिडको औरंगाबाद.
फोन नं. 0240 2476154, 9423858939
२०/११

दर रविवारी मोफत तपासणी
नसकमजोरी,शिघ्रपतन,शुक्रजंतू कमी,वांझपणा असल्यास भेटा!
डॉ.ए.एच.शेख
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
संदूल बसस्टॉड समोर,नेहरू पॅलेस, औरंगाबाद,फोन नं.(0240)2350042
9545549894
www.drshaikhkah.com
१४/११

महाशब्दकोडे (1280)



आडवी विधाने–1) अजिंक्य, पराभव न झालेला 5) पपैया, एक फळ 7) पोलिस दलातील एक अधिकाराचे पद 10) श्वान, एक पाळीव प्राणी 11) दिलेला शब्द, भाक, प्रतिज्ञा 12) जैन किंवा बुद्ध धर्मातील साधू 14) होऊन गेलेले, दशा, अवस्था 15) जेवणातील एक प्रकारची आंबट गोड आमटी 16) टरफलासहित असलेले तांदूळ 17) बाजू, पक्ष 18) श्रीशंकराचे आवडते वाद्य 21) यंत्रावर चालणारी होडी, अंगुली 22) जोगेश्वरी देवीच्या नावावर मागितलेली भिक्षा 23) दुसऱ्यांचे बोलणे ऐकण्याचे इंद्रिय 25) सती, पतिव्रता 26) देवाचे नामस्मरण करण्यासाठी असलेली रुद्राक्षाची माळ 28) अश्व 29) एकमेकांच्या विचारांबदल वाद असणे 31) चुलतभावाची आई 32) क्षार, मीठ 33) भारतातील पहिला 70 एम.एम. हिंदी चित्रपट 34) माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळातून निघणारा स्त्राव 35) लाक्षणिक अर्थाने अपायकारक सहानुभूती 36) मृदू, मुलायम 38) हाताने केलेले कलाकुसरीचे काम 41) हाताचे कसब, कौशल्य 42) एखाद्या गोष्टीवर दृष्टी स्थिर ठेवून बघत राहणे 43) दाट, गर्द, डेन्सिटीचे मराठीकरण 45) नात्यातील व्यक्ती, इष्टमित्र 47) अतिशय कठीण 48) पायाची खोट 49) डावा 50) उत्सवात लावलेले शेकडो दिवे 52) ती पहाताच "" जीव खलास झाला.... 53) अगदी सुरुवातीच्या काळातील 55) विरजलेले दूध 56) समुद्र, मगरीचे वास्तव्य असलेले जलाशय 57) लोकसंरक्षणार्थ रात्री फिरणारे शिपाई 58) नवरी मुलगी 59) प्रत्येक कार्य डाव्या हाताने सहजतेने करणारा 62) मित्रा, भेकड 63) वजा, कमी प्रतीचे, न्यून 64) अज्ञान, गैरसमज 66) आयात-निर्यातीवरचा कर वसूल करण्याची जागा 68) जिचे उंदीर भक्ष्य आहे अशी ती 70) प्रामाणिक, पतदार मनुष्य 71) एक विषम संख्या 72) मुलाची बायको 73) परीघ, वस्त्राचा पदर 75) गोळा करणे, जुळविणे 76) नगदी, नेम, कटाक्ष 78) गती कमी होणे, आळसावणे 80) निःस्वार्थ बुद्धीने दुसऱ्यांवर केलेले उपकार 82) सभेचे वृत्त, हकीकत 84) पातळ, क्षणिक, चंचल 85) ध्वनियुक्त चित्रपट 87) ज्याला समज नाही असा 88) होऊन गेलेला, दशा 90) मृत्यूदेवता 91) तीन किंवा पाच दिवस सलग चालणारा क्रिकेट सामना 92) ग्राम्यभाषेत पादत्राण

उभी विधाने–1) लक्ष, चित्त 2) खाल्लेले पदार्थ जिरणे, परिपाक 3) जंगल, अरण्य 4) पाताळातील एक मुख्य नाग 5) प्रतिज्ञा, पैज, परंतु 6) चिमटा, धरण्याचे उपकरण 7) मुसलमानांनी केलेली मक्का मदिन्याची यात्रा 8) जवळीक 9) दंत 10) प्रेमाने हात फिरविणे 13) प्रतिध्वनी 15) उत्कृष्ट लाकडाचा एक प्रकार 19) पत्रातील वृत्तांत 20) सौंदर्य 21) बिदागी देऊन पाठविणे 22) संयुक्त अक्षर 23) कार्य, कृत्य 24) नम्रतेने शीर झुकविणे 27) विझविणे, विझणे 30) भेद करणारे 31) एखाद्याची चूक कडक शब्दांनी दाखवून त्याला ताळ्यावर आणणे 37) 1 मे हा दिवस महाराष्ट्रात "" म्हणून साजरा केला जातो 37अ)गावचा मुख्य अधिकारी 38) हेकेखोर 39) दुसरे लाजतील असे कृत्य करणे 40) हरविलेल्या वस्तूंच्या शोधाची दिशा सापडणे 42) एकटाच राहणारा, एकटे राहायला आवडणारा 44) पूर्णपणे आझांकित राहणारा मनुष्य, एक वाक्प्रचार 46) चंद्र 51) आश्रय देणे, स्वीकार करणे 54) दिलीपकुमार, वैजयंतीमालाचा एक जुना चित्रपट 56) एखाद्या व्यक्तीबद्दल असलेले चांगले वाईट विचार 60) भारी, प्रतिष्ठीत व्यक्ती 61) झाकण नसलेली पुठ्ठ्याची पेटी 62) वडिलांचा भाऊ 63) बाकी ठेवणे, शिल्लक राहणे 64) गायनात उच्च स्वरापासून नीच स्वरापर्यंत स्वरांचे आवर्तन 65) जन्म, उत्पत्ती 67) स्त्री, महिला 69) व्यवस्था, जुळणी 72) राजदरबारी असलेल्या अष्ट प्रधानांपैकी एक 74) दोष ठेवणे, आळ, बालंट 77) आटवून घट्ट केलेला दुधाचा एक पदार्थ 79) गोल, वर्तुळ 80) क्षण (हिं) 81) आपट 82) बकरी, शेळी 83) विशेष जवळीक साधणे 86) छाप, शिक्का, चिन्ह 89) जरचा सोबती (उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोडयाचे उत्तर

वि	ना	य	क	दा	मो	द	र	सा	व	र	क	र	■	अ	मृ	त
धि	■	म	ल	म	ल	■	क्त	■	च	व	■	ज	■	जुं	■	स
पू	र	क	■	दु	■	उ	पा	स	क	■	श	त	मा	न	■	दी
र्व	■	■	दु	प्प	ट	■	त	मा	■	मु	नि	म	■	पु	ष्प	क
क	ल	म	■	ट	क	ळी	■	धा	म	■	■	हो	का	र	■	■
■	पं	ग	त	■	म	■	का	न	शी	ल	■	त्स	■	स्का	■	आ
र	डा	र	■	पा	क	क	ला	■	द	क्ष	■	व	जी	र	मु	ठ
■	च	■	आ	■	■	ळ	■	■	■	ण	■	■	व	■	द्रा	च
खा	■	आ	नं	द	भु	व	न	■	य	■	शं	■	ल	सा	वि	■
स	प्त	प	दी	■	■	ळा	■	द	श	मु	ख	■	ग	■	नि	रा
■	■	■	आ	वा	ज	■	बा	■	वं	द	ना	■	■	स	म	ई
लां	■	अ	नं	त	■	सं	धि	वा	त	■	द	मा	■	ल	य	■
छ	ळ	वा	द	■	सं	ग	त	■	सि	■	■	क	ल	मा	■	ध
न	■	ढ	■	क	थ	न	■	प	न्हा	ळ	ग	ड	■	न	ख	रा
■	दि	व्य	दृ	ष्टी	■	म	क	र	■	■	ज	■	प	खा	ल	■
मौ	न	■	ष्टी	■	भा	त	■	का	म	गा	र	■	सा	न	■	■